<u>नागपूर मध्यवर्ती कारागृह</u>

<u>कारखाना लोहार विभाग निवीदा दरपत्रकाद्वारे खरेदी प्रक्रिया</u>

**लोहारकाम विभागाकरीता कच्चा माल पुरवठा**

**बैठक इतिवृत्त**

**दि.११/०५/२०२६.**

---

**वाचा** :- १) महाराष्ट्र शा. उधोग उर्जा कामगार विभाग निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३ उधोग-४ दि.१/१२/१६.
२) महाराष्ट्र शा. उधोग उर्जा व कामगार विभाग निर्णय क्र.भांखस-२०२१/प्र.क्र.८/ उधोग-४ दि.०७/०५/२०२१

**परि. क्र.1 :-** नागपुर मध्यवर्ती कारागृहातील लोहारकाम विभागाकरीता लागणा-या कच्चा मालाची मागणी या कार्यालयाचे वार्षिक मागणी पत्र क्र.२७६७/२६ दि.२४/०३/२०२६ नुसार मा.मुख्यालय पुणे यांचेकडे सादर करण्यात आलेली आहे. सदर वार्षीक मागणीतील कच्चा माल मुख्यालयाकडून अप्राप्त असून नमुद कच्चा माल प्राप्त होण्यास दोन महिण्यापेक्षा जास्त अवधी लागणार असलेबाबत मुख्यालयाकडुन माहिती देण्यात आलेली आहे. लोहारकाम जोडारी यांनी दि.23/04/2026 रोजी लोहारकाम विभागामध्ये विविध शासकीय कार्यालयाच्या प्रलंबित मागणी पूर्ण करणेकामी कच्चा माल खरेदी करणे अत्यंत आवश्यक असल्याने कच्चा माल मिळणेबाबत विंनती अर्ज सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार लोहारकाम विभागाकरीता सन 2026-27 या वित्तीय वर्षाकरीता आवश्यक कच्चामाल खरेदीसाठी ई-दरपत्रक निवीदा जाहिरात कारागृह विभागाच्या <u>www.mahaprison.gov.in</u> या संकेतस्थळावर दि.30/04/2026 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्याबाबत सहभाग घेणाऱ्या व्यापाऱ्यांना तांत्रिक बाबी लिफाफा व दरपत्रक लिफाफा सादर करण्याचा कालावधी हा दि.02/05/2026 ते दि.10/05/2026 पर्यत सायंकाळी 5.00 वाजेपर्यत असून नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या मुख्यदारासमोरील पेटीत सिलबंद तांत्रिक व दरपत्रक लिफाफा टाकण्याबाबत व तसेच मा. अधिक्षक यांचे दालनात दि.11/05/2026 रोजी सायंकाळी 5.00 वा. तांत्रिक व दरपत्रक लिफाफा उघडण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

**परि. क्र.2 :-** त्याअनुषंगाने ई-दरपत्रक निवीदा जाहिरात कालावधी संपल्यानंतर कारागृहाच्या मुख्यदारासमोरील सिलबंद दरपत्रक पेटी कारागृहात घेण्यात आली. सदर ई-दरपत्रक निवीदा प्रक्रियेवर अंतिम निर्णय घेण्यासाठी दि.11/5/2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजता मा. अधिक्षक यांचे दालनात खालीलप्रमाणे कारखाना खरेदी समितीचे सदस्य उपस्थितीत होते.

१.श्री. वैभव सु. आगे, मा.अधीक्षक तथा अध्यक्ष,खरेदी समिती,नागपूर मध्यवती कारागृह.

२.श्री श्रीधर प. काळे, प्रशासन अधिकारी तथा सदस्य,खरेदी समिती, नागपूर म. कारागृह.

३.श्री पेट्रस जोसेफ गायकवाड, उपअधीक्षक, तथा सदस्य,खरेदी समिती, नागपूर म. कारागृह.

४.श्री. मनोहर व्ही.भोसले ,कारखाना व्यवस्थापक,तथा सदस्य खरेदी समिती,नागपूर म. कारागृह.

५.श्री.प्रमोद बी पत्रीवार कार्यलयीन अधीक्षक तथा सदस्य खरेदी समिती,नागपूर म.कारागृह

६.श्री. शुभम भागवत, लोहारकाम जोडारी तथा सदस्य खरेदी समिती,नागपुर म. कारागृह,

**परि. क्र.3 :-** सर्व खरेदी समितीमधील सदस्य यांचेसमक्ष सिलबंदी पेटी उघडण्यात आली असता सदर पेटीमध्ये लोहारकाम विभागाचे तात्रिंक लिफाफे 03 नग व दरपत्रक लिफाफे 02 नग सिलबंद लिफाफे आढळून आले. सहभाग घेतलेल्या व्यापाऱ्याची नावे पुढीलप्रमाणे :-

1) बाहेती ब्रदर्स नागपूर

2) युनियन ट्रेडींग नागपूर

3 ) लवली मॅचिग व स्टेशनरी, कोल्हापूर

**परि. क्र.4 :-** सदर प्राप्त झालेले लोहारकाम विभागातील सिलबंद लिफाफे मधील प्रथम तांत्रिक लिफाफे समिती समक्ष उघडून कागदपत्राची छानणी करुन तांत्रिक कागदपत्रे पडताळणी करुन तांत्रिक बाबी तपासणीचा तुलणात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून सोबत जोडण्यात आलेला आहे (परिशिष्ट क्र.1). परिशिष्ट 1 मधील तक्तानुसार सर्व प्राप्त निवीदाधारकाचा तांत्रिक बाबीची पडताळणी केलेली असता अ.क्र. 3) **लवली मॅचिग व स्टेशनरी, कोल्हापूर** या निवीदाकार यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये लायसन्स परवाना हा स्टेशनरी साहित्य विक्री संदर्भात आहे.त्याबाबत खुलासा वा स्पष्टीकरण सादर करण्यास संस्थेचे प्रतिनिधी हजर नाहीत त्यामुळे त्यांना तांत्रिक दृष्टया अपात्र करण्यात आले व तसेच **लवली मॅचिग व स्टेशनरी, कोल्हापूर** या निविदाकाराने तांत्रिक कागदपत्रासोबत दरपत्रक निविदा स्वतंत्र लिफाफा सादर केलेला नाही त्यामुळे सदर निविदाकाराने निविदा जाहिरातील अटी व शर्तीमधील अ.क्र.21 मधील (ब) ची पुर्तता केलेली नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे.

**परि. क्र.5 :-** त्याअनुषंगाने वाचा संदर्भ क्र.१ अन्वये मा. शासन निर्णय, उधोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रंमाक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3 उधोग-4 , दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील प्रकरण क्र.४ मधील उप नियम 4.4.3.1 नुसार ई-दरपत्रक निवीदा प्रक्रिया राबवित असताना कमीतकमी तिन निविदाकार यांनी भाग घेणे आवश्यक आहे.उपरोक्त तिन निविदाकारांपैकी अ.क्र. 3) **लवली मॅचिग व स्टेशनरी, कोल्हापूर** यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये लायसन्स परवाना हा स्टेशनरी साहित्य विक्री संदर्भात असल्याने व दरपत्रक निविदा स्वतंत्र लिफाफा सादर केलेला नसल्याने त्यांना अपात्र करण्यात आलेले आहे.करीता विहीत नियमानुसार कमीतकमी तीन दरपत्रके प्राप्त होणे आवश्यक असल्याने उक्त दरपत्रक प्रक्रियेस पहिली मूदतवाढ हि दि.14/05/2026 ते दि.20/05/2026 पर्यत देण्यात येवून दि.21/05/2026 रोजी सायंकाळी 5 वाजता अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे दालनात निवीदा प्रक्रिया पुनश्च करण्याचे निर्णय समितीद्वारे सर्वानुमते मान्य करुन घेण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| (शुभम भागवत)<br>लोहारकाम जोडारी(निदेशक)<br>नागपूर मध्यवर्ती कारागृह | (प्रमोद बी पत्रीवार)<br>कार्यालयीन अधीक्षक<br>नागपूर मध्यवर्ती कारागृ | (मनोहर वि. भोसले)<br>कारखाना व्यवस्थापक<br>नागपूर मध्यवर्ती कारागृह |
| 11/5/2026<br>(श्री पेट्रस जोसेफ गायकवाड)<br>उपअधिक्षक<br>नागपूर मध्यवर्ती कारागृह | (श्रीधर प. काळे )<br>प्रशासन अधिकारी तथा उपअधिक्षक<br>नागपूर मध्यवर्ती कारागृह | (वैभव सु.आगे)<br>अधीक्षक<br>नागपूर मध्यवर्ती कारागृह |

सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र.0712-2461413
Email-nagpurcp-mh@gov.in

महाराष्ट्र शासन
गृह विभाग (कारागृह)

अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह
वर्धा रोड, अजनी चौक, नागपूर-440020

जा.क्र.कारखाना उद्योग/ लोहारकाम विभाग/दरपत्रक/4158/२०२६,नागपुर मध्यवर्ती कारागृह दि.11/05/2026

प्रति,

**मा. अपर पोलीस महासंचालक व,**
**महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**

**विषय** :-नागपूर मध्यवर्ती कारागृहातील लोहारकाम विभागाकरीता कच्चा माल दरपत्रकाद्वारे खरेदीकरीता सुधारीत जाहीरात कारागृह विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी सादर करणेबाबत

**संदर्भ**:- 1)मा. उधोग उर्जा व कामगारविभाग शासन निर्णयक्र. भांखस-१४/प्र.क्र.८५२/भाग-३, उद्योग-४, दि.०१.१२.१६
2) मा.उधोग उर्जा व कामगारविभाग शासन निर्णयक्र. भांखस-२०२१/प्र.क्र.८/भाग-३, उद्योग-४, दि.०७.०५.२१
3) मा.शासन निर्णय क्र.एमआयएस 1019/प्र.क्र.51/2019/ अर्थसं-1 दि.17/07/2019
4) या कार्यालयाचे पत्र क्र.3746/2026 दि.30/04/2026

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, सन 2026-2027 करीता नागपूर मध्यवर्ती कारागृहातील लोहारकाम विभागाकरीता कच्चा माल खरेदी प्रक्रियेकरीता संदर्भिय पत्र क्र.2 मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार 10 लक्ष च्या मर्यादेत दरपत्रक प्रक्रिया राबवून कारागृह कारखान्यातील लोहारकाम विभागाकरीता कच्चा माल खरेदी करणे आवश्यक आहे.

कच्चा माल दरपत्रक प्रक्रिया सन 2026-27 करीता दरपत्रक प्रक्रियेद्वारे कच्चा माल खरेदीसाठी अधोरेखीत केलेल्या अटी व शर्ती इत्यादींची संपूर्ण माहिती कारागृह विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड संदर्भिय पत्र क्र.4 नुसार करण्यात आलेली होती. मा. शासन निर्णय दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील अटी व शर्तीची पुर्तता न झाल्याने सदरील ई-दरपत्रक निविदा प्रक्रियेस पहिली मूदतवाढ हि दि.14/05/2026 ते दि.20/05/2026 पर्यत देण्यात येत आहे.

दि.14/05/2026 ते दि.20/05/2026 पर्यत मुदतवाढ देण्यात येत असून कारागृहाचे वेबसाईटवर ई-सेल मार्फत सुधारीत जाहिरात अपलोड करण्याबाबत या पत्राद्वारे विनंती करण्यात येत आहे.

आपला विश्वासु
(वैभव सु. आगे)
अधीक्षक
नागपुर मध्यवर्ती कारागृह
नागपुर

प्रत-मा.कारागह उपमहानिरीक्षक,कारागृह व सुधारसेवा,पूर्व विभाग,नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.